२१५

९१५

**PRESS NOTE**

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

**प्रसिद्धी पत्रक**

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्त संपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(सत्यवान इथापे)
ह सहा. जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.०१
दिनांक : ०१.०४.२०२२

**बेस्ट चे नवे जनसंपर्क अधिकारी**

मुंबई, ०१ - बेस्ट उपक्रमाचे जनसंपर्क अधिकारी म्हणून श्री. मनोज वराडे यांची नुकतीच नेमणूक करण्यात आली आहे. श्री. वराडे यांनी जनसंपर्क व्यवस्थापन या विषयामध्ये पदव्युत्तर पदविका प्राप्त केली असून जनसंपर्क विषयामध्ये मुंबई विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी संपादन केली आहे.

यापूर्वी बेस्ट उपक्रमाच्या विविध विभागांमध्ये विविध पदांवर त्यांनी काम केलेले असून जनसंपर्क विभागामध्ये सहायक जनसंपर्क अधिकारी तसेच उप जनसंपर्क अधिकारी म्हणून देखील श्री. वराडे यांनी काम केले आहे.

बेस्ट उपक्रमाचे अधिकृत फेसबुक पेज आणि ट्विटर हँडल सुरु करण्याकरिता त्यांनी प्रयत्न केले आहेत.

........

Scanned with OKEN Scanner

३१५

संपादक / वृत्त संपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

मसुवराडे ०१/०४/२०२२
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट
**प्रसिद्धी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र १९२, मुंबई - ४०० ००१

प्रसिध्दी पत्रक क्र.०२
दिनांक : ०१.०४.२०२२

**दि.०२.०४.२०२२ रोजी लोकार्पण करण्यात येणा-या मेट्रो सेवेला पुरक बेस्ट उपक्रमाची बससेवा**

मुंबई, ०१ - दि.२ एप्रिल २०२२ पासून मुंबई शहराच्या पश्चिम उपनगरामध्ये दहिसर येथून डहाणुकरवाडी दरम्यान मेट्रोरेल-२ ए आणि दहिसर येथून आरे दरम्यान मेट्रोरेल-७ चे लोकार्पण करण्यात येत आहे. या अनुषंगाने या दोन्ही मेट्रोंना पुरक असलेली बेस्ट उपक्रमाची बससेवा पुढीलप्रमाणे आहे -

**१. मेट्रो-२ (अ) च्या स्थानकांवरुन उपलब्ध असलेले विद्यमान बसमार्ग**

| अ.क्र | मेट्रो स्थानक | बसथांबा | बसमार्ग | ठिकाणांकरीता बससेवा उपलब्ध |
|---|---|---|---|---|
| १ | दहिसर | घरटनपाडा | ७००,७०६,७१८ | काशिमिरा, भाईंदर, मिरा रोड इ. |
| २ | अप्पर दहिसर | सेंट मेरी स्कुल / विठ्ठल रुक्मीणी मंदिर | २०७,२०९, सी-१२ | आशिष संकुल, एन एल संकुल, आनंद नगर, पर्वत नगर, आंबावाडी, दौलतनगर |
| ३ | कांदरपाडा | ऋषी संकुल (विस्तारीत) | सी-१२,ए-२४०, ए-२४५ | ऋषी संकुल, माऊंट पोयसर, एलआयसी, साईबाबा नगर, गणपत पाटील नगर |
| ४ | मंडपेश्वर | सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालय | सी-१२, ए-२४५ | गणपत पाटील नगर,शांती आश्रम, गोविंद नगर |
| ५ | एक्सर | शांती आश्रम / एसके रिसॉर्ट | सी-१२ | दहिसर ते सांताक्रुझ दरम्यान लिंक रोडवरील सर्व ठिकाणे |
| ६ | बोरिवली (प) | डॉन बॉस्को | सी-१२,२०२, २२४,२२६,२४४, २४६,२४७,२६९, २७७,२९४,४६१, ७२० | गोराई खाडी, बोरिवली स्थानक, एमएचबी वसाहत, चारकोप सेक्टर-१, चारकोप सेक्टर-२, गोराई पुल, वझीरा नाका, महाराष्ट्रनगर, |
| ७ | पहाडी एक्सर | शिंपवलीगांव | २४५,२४७,२९४, २९६ | चारकोप सेक्टर-१, चारकोप सेक्टर-२, हरिदास नगर, कस्तुर पार्क, शिंपवली नाका, बोरिवली जेल, एमएचबी वसाहत |
| ८ | कांदिवली | कामराज नगर | २२३,२८०, सी-१२ | एकतानगर, रेणुकानगर, शांती नगर, लालजीपाडा |
| ९ | डहाणुकरवाडी | डहाणुकरवाडी | २०४,२०६,२०७, २४४,२४६,२८०, २८१,२८६,४६० | शांती नगर, लालजीपाडा, मिट चौकी, एव्हरशाईन नगर, सहयाद्री नगर, चारकोप नाका, कांदिवली स्थानक (प), कांदिवली इंडस्ट्रियल इस्टेट, खारोडी, मालवणी, चारकोपगांव |

....२

२. मेट्रो-७ च्या स्थानकांवरुन उपलब्ध असलेले विद्यमान बसमार्ग

| अ.क्र. | मेट्रो स्थानक | बसथांबा | बसमार्ग | लगतची ठिकाणे |
|---|---|---|---|---|
| १ | दहिसर | घरटनपाडा | ७००,७०६, ७१८ | काशिमीरा, भाईंदर, मिरा रोड इ. |
| २ | ओवरीपाडा | जय महाकाली मंदिर | २९७,२९८, ७००,७०७, ७१८ | कोकणीपाडा, मिनी नगर, गणेश नगर, रावळपाडा, अशोकवन, बोरिवली स्थानक, |
| ३ | राष्ट्रीय उद्यान | ओंकारेश्वर मंदिर | १८८,२९३, २९७,२९८, २९९, ४७०,४७८,४९८, ५२४,६२९,७००, ७०१,७०२,७०३, ७०५,७०६,७०९, ७१०, ७१८,ए-६० | कान्हेरी गुंफा, श्रीकृष्ण नगर, नॅन्सी कॉलनी, शांतीवन, बोरिवली स्थानक, |
| ४ | देवीपाडा | देवीपाडा | ४७०,४७८,४७९, ४९८,५२४,७०१, ७०२,७०३,७०५, ७०६,७०९,७१०, ७१८ | जय महाराष्ट्रनगर, मागाठणे आगार |
| ५ | मागाठणे | मागाठणे दूरध्वनी केंद्र | २०९,२२३,२२६, ४४०,४६१,४७०, ४७८,४७९,४९८, ५२४,६२९,७०१, ७०३,७०५,७०६, ७१८ | जिवलापाडा, सिध्दार्थ नगर, व्हाईसरॉय पार्क, ठाकुरगांव, धिरज एन्चलेव्ह, पांडे नगर, एव्हरशाईन मिलेनियम पॅराडाईझ |
| ६ | पोयसर | बी.एच.ए.डी. / महिंद्रा | २२६,४४०,४६१, ४७०,४७८,४९८, ५२४,७०१,७०५, ७०६,७१८,सी-७१, सी-७२,ए-२८७, ए-३००, ए-६० | ठाकुरगांव, ठाकुर संकुल, समता नगर, ठाकुर सिनेमा |
| ७ | आकुर्ली | बाण डोंगरी | २८२,२८९,ए२८७, ए-२८८,ए-३०० | दामू नगर, अनिता नगर, अलिका नगर, क्रांती नगर, लोखंडवाला संकुल, कांदिवली स्थानक (पूर्व) |
| ८ | कुरार | पुष्पा पार्क | ६२४,२८१ | आप्पा पाडा, आदर्श नगर, मालाड स्थानक (पूर्व), शांताराम तलाव |
| ९ | दिंडोशी | पठाणवाडी | ३४५, ६०१ | मालाड स्थानक (पूर्व), संतोषनगर, वडारपाडा, आप्पा पाडा, आदर्श नगर, कोकणीपाडा, त्रिवेणी नगर, |
| १० | आरे | विरवाणी इस्टेट | ३२६,३२७,३४३, ३४४,३४६,३४९, ३९८,४६०,४८९ | संतोष नगर, दादासाहेब फाळके चित्रनगरी, नागरी निवारा प्रकल्प, गोकुळधाम, शिवशाही प्रकल्प, आरे वसाहत, आदर्श नगर, आरे सेंट्रल डेअरी, न्युझीलंड हॉस्टेल, |

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner



३. **नवीन बसमार्ग** –

सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या उपरोक्त बससेवांव्यतिरिक्त दोन नवीन बसमार्ग सुरु करण्यात येत आहेत. ज्या बसमार्गाद्वारे मेट्रोरेलने प्रवास करणा-या प्रवाशांना अतिरिक्त बससेवा उपलब्ध होईल. या नवीन बसमार्गांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे -

१. **बसमार्ग क्र.ए-६४७** – हा बसमार्ग **शिवशाही प्रकल्प** येथून **मेट्रो-७** वरील **आरे मेट्रो स्थानका** दरम्यान नागरी निवारा प्रकल्प, सामना परिवार, वाघेश्वरी मंदिर, गोकुळधाम मार्केट, दिंडोशी आगार, विरवाणी इस्टेट, गोरेगांव चेकनाका मार्गे प्रवर्तित करण्यात येईल.

**या बसमार्गाची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे -**

१. या बसमार्गावरील बसगाडया संपूर्ण आठवडा पूर्ण दिवस १९ / २० मिनिटांच्या प्रस्थानांतराने उपलब्ध आहेत.

२. प्रस्थानस्थान -

| | | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) |
|---|---|---|---|
| **अ) आरे मेट्रो स्थानक - चेकनाका** | : | ६.२० | २२.०० |
| **ब) शिवशाही प्रकल्प/मंत्री पार्क** | : | ६.०० | २१.४० |

३. **बसथांबे** : गोरेगांव चेकनाका क्र.१ – विरवाणी इस्टेट - जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग नाका – दिंडोशी बसस्थानक – सत्र न्यायालय दिंडोशी - गोकुळधाम मार्केट - वाघेश्वरी मंदिर – सामना परिवार – सुयश शॉपिंग सेंटर – नागरी निवारा संकल्प सोसायटी – इन्फिनीटी आय.टी. पार्क – मैत्री सोसायटी – नागरी निवारा विभाग १ व २ – सातपुडा सोसायटी – शिवशाही प्रकल्प / मंत्री पार्क

२. **बसमार्ग क्र.२७४** – हा बसमार्ग कांदिवली स्थानक (प) आणि बंदर पाखाडी दरम्यान मेट्रो रेल-२ (ब) च्या डहाणुकरवाडी स्थानकाजवळून प्रवर्तित करण्यात येईल.

या बसमार्गाची ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे -

**या बसमार्गाची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे -**

१. या बसमार्गावरील बसगाडया संपूर्ण आठवडा पूर्ण दिवस १५ ते १७ मिनिटांच्या प्रस्थानांतराने उपलब्ध आहेत.

२. प्रस्थानस्थान -

| | | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) |
|---|---|---|---|
| **अ) कांदिवली स्थानक (प)** | : | ६.०० | २१.४५ |
| **ब) बंदर पाखाडीगांव** | : | ६.१५ | २२.०० |

**३.बसथांबे** : कांदिवली स्थानक (प) - देना बँक - काळा मारुती मंदिर – महात्मा गांधी तरण तलाव - कांदिवलीगांव – वैशाली भवन – **डहाणुकरवाडी मेट्रो स्थानक** - कामराजनगर – ज्ञानेश्वर विद्यालय – नेताजीनगर पब्लिक स्कुल - बंदर पाखाडीगांव

=========

e१५

कृपया प्रसिद्धीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

मसूरकर
६।४।२०२२
जनता संपर्क अधिकारी

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
**प्रसिद्धी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिद्धी पत्रक क्र. ०३
दि.०६.०४.२०२२

**छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे टर्मिनल-१ व टर्मिनल- २ यांना जोडणारी बेस्ट उपक्रमाची बससेवा कार्यान्वित.**

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून देशांतर्गत तसेच आंतरदेशीय विमानसेवा कार्यान्वित करण्यात येते. या विमानतळावर आंतरराष्ट्रीय तसेच आंतरदेशीय विमान उड्डाणांकरीता वेगवेगळी टर्मिनल असून सदर टर्मिनल्स, टर्मिनल-१ (T-1) व टर्मिनल-२ (T-2) या नावाने ओळखली जातात. अनेक प्रवासी टर्मिनल-१ वरुन टर्मिनल-२ अथवा विरुध्द दिशेने विमान बदल करुन प्रवास करणारे असतात. अशा प्रवाशांना या दोन टर्मिनल्सच्या दरम्यान किफायतशीर बससेवा उपलब्ध होण्याकरीता **गुरुवार दि.७ एप्रिल २०२२ पासून** बेस्ट उपक्रमाची वातानुकूलित बससेवा सुरु करण्यात येत आहे.

ही बससेवा छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ - **टर्मिनल-२** आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरदेशीय विमानतळ - **टर्मिनल-१** दरम्यान **२४ तास, २० / ३० मिनिटांच्या प्रस्थानांतराने संपूर्ण आठवडा** कार्यान्वित राहील. या बससेवेवर एका बसफेरीकरीता **रु.५०/- प्रवासभाडे** आकारण्यात येईल.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून विमान प्रवास करणा-या सर्व प्रवाशांनी T-1 व T-2 दरम्यान प्रवास करताना या किफायतशीर बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बेस्ट उपक्रमाद्वारे करण्यात येत आहे.

***********************************

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

99/५

**PRESS NOTE**

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिद्धीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

०७/४/२०२२
(मनोज वराडे )
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिद्धी पत्रक क्र.४
दिनांक : ०७.०४.२०२२

**बस प्रवासाला प्रोत्साहन देण्यासाठी बेस्टचे डिजिटल अभियान ...'पुढे चला'**

*(सचिन तेंडुलकर आणि अनिल कपूर यांनी त्यांच्या बेस्ट बसने केलेल्या प्रवासाच्या आठवणींना दिला उजाळा, बेस्टच्या डिजिटल अभियानासाठी दिले प्रोत्साहन)*

मुंबई, ७ - बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) यांनी त्यांच्या एका अभिनव मोहिमेमध्ये, 'पुढे चला' या अभियानांतर्गत दोन ब्रँड चित्रफित लॉंच केले आहेत. पुरस्कार-प्राप्त चित्रपट निर्माते श्री. अभिनय देव यांची निर्मिती असलेल्या या चित्रीफितीमध्ये श्री. सचिन तेंडुलकर आणि श्री. अनिल कपूर हे स्टार्स, त्यांच्या लहानपणापासून त्यांनी बेस्ट बसमधून केलेल्या प्रवासांच्या जुन्या आठवणींविषयी आपल्याशी बोलत आहेत.

श्री. तेंडुलकर, श्री. कपूर, श्री. देव आणि त्यांची प्रॉडक्शन टीम रमेश देव प्रॉडक्शन्स (आरडीपी) आणि श्री. बर्मन यांना बेस्ट धन्यवाद देऊ इच्छिते. या सर्वांनी या उपक्रमासाठी विनामोबदला काम केले आहे . या उपक्रमासाठी काम करणाऱ्या सिरिती या क्रीएटिव्ह एजन्सीने देखील विनामोबदला काम केले आहे . हे अभियान, 'NCMC-मानकांना अनुकूल डिजिटल तिकीट सोल्यूशन' च्या अंमलबजावणीतील बेस्टचे तंत्रज्ञान भागीदार 'चलो' यांच्याबरोबरच्या भागीदारीत कार्यान्वित करण्यात आले आहे.

सर्व मुंबईकरांसारखीच बेस्टने श्री. तेंडुलकर आणि श्री. कपूर यांच्या आयुष्यात देखील महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या चित्रफितींमध्ये आपण त्यांना ते अनुभवाचे क्षण पुन्हा जगताना पाहणार आहोत. क्रिकेटच्या सरावासाठी शिवाजी पार्कवर वेळेवर पोहोचण्यासाठी आपण भल्या सकाळी कशी बस पकडत होतो, याविषयीच्या आठवणी सांगताना श्री. तेंडुलकर तसेच मुंबईमधील स्टुडिओंमध्ये व ऑडिशन्सकरिता जाण्यासाठी आपल्या तेव्हाच्या चेंबुर येथील घरापासून आपण कसे बसने जात होतो, याविषयीच्या आठवणी सांगताना श्री. अनिल कपूर यांना आपण या चित्रफितींमध्ये बघणार आहोत. दोन्ही स्टार्सनी त्यांच्या खऱ्या आयुष्यातील बस प्रवासाचे स्वतःहून आणि दिलखुलासपणे सांगितलेले अनुभव ह्या पटकथेमध्ये गुंफले आहेत. बेस्टने त्यांना त्यांच्या आयुष्यामध्ये पुढे जाण्यासाठी आणि त्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी मदत केली असे सांगत आणि बेस्ट आता स्वतः तिच्या नवीन डिजिटल बस सेवांसह पुढे जात आहे,ह्या गोष्टीवर प्रकाश टाकत दोघेही चित्रफितीचा शेवट करतात.

२ एप्रिल २०२२ रोजी गुढीपाडव्याच्या दिवशी, या अभियानाचे टीजर्स लॉंच करण्यात आले. सोशल मीडियावरती चित्रफितींच्या ह्या टीजर्सना ६ लाखांपेक्षा अधिक व्यूव्ज आणि १० लाखांपेक्षाही अधिक लाईक्स व शेअर्स असा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

माननीय श्री. उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांची दूरदृष्टी आणि मार्गदर्शनाखाली, 'बेस्ट २.० पुढे चला' ह्या अभियानाचा प्रारंभ २१ डिसेंबर २०२१ रोजी माननीय श्री. आदित्य ठाकरे, पर्यटन व पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र शासन, यांचे हस्ते झाला. केवळ ३ महिन्यांमध्ये १० लाखांहून अधिक 'बेस्ट चलो ॲप' डाऊनलोड होण्यासोबतच ह्या नवीन डिजिटल सेवांना मुंबईकरांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे.

9314

....२...

जेव्हा सार्वजनिक वाहतूक सेवा ही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असते आणि वक्तशीर व विश्वासार्ह असते तेव्हा अधिक लोक त्याकडे वळतात, या गोष्टीवर वाहतूक क्षेत्रातील अनेक तज्ञांनी भर दिला आहे. बेस्टच्या डिजिटल सेवा, त्यांच्या बस सेवांना 'लाइव्ह बस ट्रॅकिंग ' आणि 'लाइव्ह पॅसेंजर इंडिकेटर' ह्या वैशिष्ट्यांद्वारे अधिक विश्वासार्ह बनवतात आणि मोबाइल तिकिटे व लक्षणीय वेळ वाचविणारे ७२ नवीन प्लॅन्स देऊन प्रवाशांना अधिक चांगला अनुभव देतात. या अभियानाद्वारे, सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देण्याचे आणि मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्याचे महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री यांचे स्वप्न आहे, ते पूर्ण करण्यासाठी बेस्ट नेहमीच तत्पर असेल.

**चित्रपट ऑनलाइन पहा:**

श्री. *सचिन तेंडुलकर* (मराठी): https://youtu.be/xzu0XcOe1Go

श्री. *सचिन तेंडुलकर* (हिन्दी): https://youtu.be/CE65HPE6I7g

श्री. *अनिल कपूर* (हिन्दी): https://youtu.be/EgEzdQM_gig

या चित्रफिती 'बेस्ट' आणि 'चलो'च्या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर देखील पाहता येतील :

बेस्ट: Twitter, Facebook

चलो: Twitter, Instagram, Facebook, LinkedIn, YouTube

.....

Scanned with OKEN Scanner

954

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

**For favour of publication**

The Editor/News Editor.

(Manoj Varade)
Public Relations Officer

---

Press Note No.4
Date : 07.04.2022

**BEST Launches Pudhe Chala Campaign To promote Digital Bus Travel initiative**

*(Sachin Tendulkar and Anil Kapoor reminisce about their journeys on BEST buses, promote digital initiative bus travel)*

Mumbai, 7 - In a one-of-its-kind innovative campaign, the Brihanmumbai Electric Supply and Transport (BEST) Undertaking has launched two brand films under the Pudhe Chala campaign. Made by award-winning filmmaker Mr. Abhinay Deo, the films star Mr. Sachin Tendulkar and Mr. Anil Kapoor talking us through their nostalgia for their BEST bus journeys from their younger days.

The BEST would like to thank Mr. Tendulkar, Mr. Kapoor, Mr. Deo and his production team Ramesh Deo Productions (RDP), and Mr. Burman, all of whom waived their fees for this project. The creative agency on the project, Siriti, also waived their fees. The campaign has been executed in partnership with Chalo, BEST's technology partner in implementing the 'NCMC Compliant Digital Tickets Solution'.

Just like for all Mumbaikars, BEST buses played an important role in Mr. Tendulkar's and Mr. Kapoor's lives. In the films, we see them re-living these experiences. Mr. Tendulkar recalls how he used to take a bus early morning to reach Shivaji Park for cricket practice on time; and Mr. Kapoor reveals that he took buses from his then Chembur home to studios and auditions across Mumbai. Both stars generously volunteered details of their real life bus experiences, which were crafted into the script. Both end the films by saying that BEST helped them move ahead in life and achieve their dreams, and highlight that now BEST itself is moving ahead with its new digital travel services.

Teasers for this campaign were launched on 02 April 2022 on Gudi Padwa. The teaser films garnered a huge response with more than 6 lakh views and more than 10 lakh likes and shares on social media.

Under the vision and guidance of Shri Uddhav Thackeray, Hon'ble Chief Minister, Government of Maharashtra, the BEST 2.0 Pudhe Chala campaign was launched on 21 December 2021 at the hands of Shri Aaditya Thackeray, Hon'ble Minister of Tourism and Environment, Government of Maharashtra. The new digital services have seen tremendous response from the people of Mumbai, with the BEST Chalo mobile app clocking more than 10 lakh downloads in just 3 months.

Several transportation experts have emphasised that more people switch to public transport when it is available in plenty and is punctual and reliable. BEST's digital services make the bus service reliable through live bus tracking and the live passenger indicator; and improve the passenger experience with mobile tickets and 72 new Super Saver travel plans. With this campaign, the BEST continues its thrust to fulfil the vision of the Hon'ble Chief Minister of Maharashtra in promoting public transport and helping to decongest Mumbai.

**View the films online:**

Mr. Sachin Tendulkar (Marathi): https://youtu.be/xzu0XcOe1Go
Mr. Sachin Tendulkar (Hindi): https://youtu.be/CE65HPE6I7g
Mr. Anil Kapoor (Hindi): https://youtu.be/EgEzdQM_qig
The films are also available on BEST's and Chalo's social media platforms:
BEST: Twitter, Facebook
Chalo: Twitter, Instagram, Facebook, LinkedIn, YouTube

==========

Scanned with OKEN Scanner

१८५

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
**प्रसिध्दी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.०५

दिनांक : १८.०४.२०२२

**बेस्टतर्फे बस प्रवाशांना भारतातील पहिला " टॅप इन टॅप आऊट " अनुभव**

मुंबई,१८ - मुंबईकर बस प्रवाशांसाठी नेहमी विविध प्रकारच्या सुविधा पुरविणाऱ्या बेस्ट उपक्रमाकडून यावेळी देखील एका आगळ्या वेगळ्या सुविधेचा लाभ लवकरच बस प्रवाशांना मिळणार आहे.

१०० टक्के डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित असलेली " **टॅप इन टॅप आऊट** " सेवा भारतामध्ये सर्वप्रथम बेस्ट उपक्रमाद्वारे लवकरच प्रवाशांच्या सेवेकरिता उपलब्ध करण्यात येणार आहे. बेस्ट चलो स्मार्ट कार्ड तसेच चलो मोबाइल ॲपद्वारे प्रवासी सदर सुविधेचा लाभ घेऊ शकतात. संपूर्ण जगभरात मोबाइल ॲपद्वारे " **टॅप इन टॅप आऊट** " सेवा केवळ बेस्ट मध्ये प्रथमच उपलब्ध होणार आहे.

या आधुनिक सेवेमुळे बस प्रवाशांना सुट्ट्या पैशांच्या कटकटीपासून कायमचा दिलासा मिळणार आहे.

तरी सर्व प्रवाशांनी या आधुनिक अशा १०० टक्के डिजिटल सेवेचा उपयोग करून आपला प्रवास अधिकाधिक **बेस्ट** करावा, असे आवाहन बेस्ट उपक्रमा मार्फत करण्यात येत आहे.

..........

Scanned with OKEN Scanner

२९५

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

मनोज वराडे १८/४/२०२२.

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.०६

दिनांक : १८.०४.२०२२

**असोसिएशन ऑफ ऑफ स्टेट रोड ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग्ज आणि बेस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने स्थायी समिती सभेचे आयोजन**

मुंबई,१८ - नवी दिल्ली येथील असोसिएशन ऑफ ऑफ स्टेट रोड ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग्ज आणि बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने बेस्टच्या कुलाबा येथील मुख्यालयात आज सकाळी ११ वाजता एका स्थायी समिती सभेचे आयोजन बेस्टचे महाव्यवस्थापक माननीय लोकेश चंद्र यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. ७२ रस्ते वाहतूक मंडळे सदस्य असलेल्या या संस्थेद्वारे प्रवासी वाहतूक या प्रमुख विषय विषयावर भारतातील विविध राज्यांच्या रस्ते वाहतूक मंडळांचे प्रतिनिधी या सभेला चर्चा करण्यासाठी उपस्थित होते.

आंध्र प्रदेश स्टेट रोड ट्रांसपोर्ट कॉर्पोरेशन, कर्नाटक स्टेट रोड ट्रांसपोर्ट कॉर्पोरेशन, पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड, राजस्थान स्टेट रोड ट्रांसपोर्ट कॉर्पोरेशन, उत्तर प्रदेश स्टेट रोड कॉर्पोरेशन या संस्थांच्या प्रतिनिधींनी त्यांनी अमलात आणलेल्या विविध प्रवासीभिमुख सेवा, डिजिटल सेवांवर आधारित पायाभूत सेवा अधिक सक्षम करून त्यांचा सकारात्मक परिणाम प्रवाशांना जास्तीत जास्त कसा करून देता येईल अशा विषयांवर सादरीकरण केले.

यावेळी बोलताना श्री लोकेश चंद्र असे म्हणाले की एक देश एक कार्ड या सरकारच्या संकल्पनेचा विचार करता NCMC कार्डाचा उपयोग प्रवासाव्यतिरिक्त इतर ठिकाणी देखील रकमेचे प्रदान करण्याकरिता बँकेच्या कार्डाप्रमाणे झाल्यास प्रवाशांना अधिक फायदा होईल. बेस्ट उपक्रमाच्या डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित " टॅप इन टॅप आऊट " सेवेचे अवलोकन देखील मान्यवरांनी केले.

यानंतर सर्व मान्यवरांनी बेस्ट उपक्रमाच्या वडाळा आगारातील कमांड कंट्रोल सेंटरला भेट देऊन त्याची कार्यप्रणाली जाणून घेतली. दिवस अखेर सर्व मान्यवरांनी बेस्ट उपक्रमाच्या खुल्या दुमजली बस मधून ' हेरिटेज टूर ' चा मनसोक्त आनंद घेतला. यावेळी ए. एस्. आर. टी. यु. चे तांत्रिक कार्यकारी संचालक श्री किशोर, सहाय्यक संचालक श्री राजीव झा तसेच विविध वाहतूक मंडळांचे मान्यवर प्रतिनिधी उपस्थित होते.

..........

Scanned with OKEN Scanner

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

(सुरेश गायकवाड)
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.७
दिनांक : १९.०४.२०२२

# फिरते वीज देयक भरणा केंद्र

मुंबई, १९ - बेस्ट उपक्रमाने त्यांच्या वीजग्राहकांसाठी फिरते वीजदेयक भरणा केंद्र (मोबाईल कॅश कलेक्शन व्हॅन) कार्यान्वित केले आहे. वीज ग्राहक त्यांच्या वीजदेयकाव्यतिरिक्त पाणी, मालमत्ता आणि इतर महापालिका सेवा कर, गॅस, डीटीएच, क्रेडिट कार्ड, शैक्षणिक शुल्क, फास्ट टॅग रिचार्ज, सदस्यता शुल्क, दूरध्वनी आणि भ्रमणध्वनी यांच्या देयकाचे प्रदान, केबल तसेच ब्रॉडबॅंड सेवांचे प्रदान, बेस्टच्या किऑस्क आणि इतर देयके सुध्दा 'भारत बील पे सिस्टिम' या सुविधेचा फायदा घेऊन भरु शकतात.

बेस्टचे वीजग्राहक 'फिरते वीजदेयक भरणा केंद्राच्या' सुविधेचा फायदा खालील वेळापत्रकाप्रमाणे घेऊ शकतात.

| फिरत्या रोख भरणा केंद्राचे ठिकाण | आठवडयाचे दिवस | वेळ | प्रभाग |
|---|---|---|---|
| धारावी आगार | सोमवार | सकाळी ९.३० वा. ते सायं. ४.३० वा. | जी / उत्तर |
| वरळी कोळीवाडा | मंगळवार | सकाळी ९.३० वा. ते सायं. ४.३० वा. | जी / दक्षिण |
| गीता नगर, कुलाबा | बुधवार | सकाळी ९.३० वा. ते सायं. ४.३० वा. | अे |
| नाना चौक, ताडदेव | गुरुवार | सकाळी ९.३० वा. ते सायं. ४.३० वा. | डी |
| नायगाव, भोईवाडा, अपना बाजार | शुक्रवार | सकाळी ९.३० वा. ते सायं. ४.३० वा. | एफ / दक्षिण |
| अॅन्टॉप हिल, कोकरी आगार | शनिवार | सकाळी ९.३० वा. ते सायं. ४.३० वा. | एफ / उत्तर |
| शिवाजी पार्क, दादर | रविवार | सकाळी ९.३० वा. ते सायं. ४.३० वा. | जी / उत्तर |

तरी, सर्व मुंबईकर जनतेने या अत्याधुनिक सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन बेस्ट उपक्रमाद्वारे करण्यात येत आहे.

.......

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
**प्रसिद्धी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र १९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.८
दिनांक : २५.०४.२०२२

## बेस्ट उपक्रमातर्फे भारतातील पहिल्या एन.सी.एम.सी. कार्डचा लोकार्पण सोहळा

मुंबई, २५ - मुंबई शहरातील बस प्रवाशांच्या सोयीकरिता बेस्ट उपक्रमातर्फे नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एन.सी.एम.सी) सेवेचा लोकार्पण सोहळा आज दिनांक २५.०४.२०२२ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मान.श्री.उध्दव ठाकरे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमप्रसंगी महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री मान.श्री.अजित पवार अध्यक्षस्थानी उपस्थित होते तसेच मान. पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार मंत्री श्री. आदित्य ठाकरे, परिवहन मंत्री मान. ॲड अनिलजी परब, खासदार मान. श्री. अरविंदजी सावंत, . बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. इक्बाल सिंह चहल आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

मुंबईकर सदर संपर्कविरहित टॅप-टू-चे प्रीपेड कार्ड बस प्रवासाकरिता आणि जिथे एनसीएमसी कार्डस् स्विकारली जातात अशा सर्व ठिकाणी म्हणजे मेट्रो, दुकाने, रेस्टॉरंट्समध्ये आणि अगदी ऑनलाईन पेमेंटसाठी देखील वापरु शकतात.

Scanned with OKEN Scanner

===२===

आपल्या प्रास्तविक भाषणात बोलताना बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक श्री.लोकेश चंद्र असे म्हणाले की, मुंबईकर जनतेला कार्यक्षम, विश्वसनीय आणि दर्जेदार सेवा देण्यासाठी बेस्ट कटिबध्द आहे. सरकारच्या ई - वाहन धोरणानुसार बेस्टच्या ताफ्यामध्ये भविष्यकाळात जास्तीत जास्त इलेक्ट्रिक बसगाडयांचा समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे मिशन १०,००० अंतर्गत २०२५-२६ पर्यंत बेस्टचा एकूण बसताफा १०,००० बसगाडया इतका करण्याचे उद्दिष्ट आहे..

याप्रसंगी बोलताना मान. मंत्री श्री. आदित्य ठाकरे म्हणाले की, बेस्ट हीच मुंबईची खरी लाईफलाईन असून देशभरात स्वस्त आणि मस्त अशी सेवा देणारा असा देशातच नव्हे तर जगभरात एकमेव उपक्रम आहे

महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री मान.श्री. उध्दवजी ठाकरे यांनी ८७ मर्यादित या बसमार्गाच्या आठवणी सांगताना बेस्ट उपक्रमाचे कौतुक करण्यास आलो असून मला बेस्टचा अभिमान वाटतो असे सांगितले. बेस्ट उपक्रमाने सुरु केलेल्या एन सी एम सी कार्डच्या सेवेमुळे सुट्या पैशांचा प्रश्न सुटेल. बेस्ट हा नंबर १ चा माफक दरात सेवा देणारा उपक्रम आहे. कोरोना काळातील अलौकिक योगदानाबद्दल त्यांनी बेस्टच्या उपक्र हकांचे विशेष कौतुक केले आणि त्यांच्या शुभहस्ते मार्च २०२२ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या बेस्टमधील १५४४ कर्मचा-यांच्या उपदानाच्या ४६३.०० कोटी रुपये इतक्या रकमेचे प्रदान त्यांच्या बँकेतील खात्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले.

====

Scanned with OKEN Scanner

३१५
२८५

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२, मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.९
दिनांक : २९.०४.२०२२

**बेस्ट उपक्रमाच्या जुन्या स्मार्टकार्डमधील "E-purse" शिल्लक रकमेचा परतावा आणि स्मार्टकार्ड रद्द करणेबाबत – शेवटची तारीख**

मुंबई, २९ - बेस्ट उपक्रमाने दि.२१ डिसेंबर २०२१ पासून CHALO MOBILITY प्रा.लि. या व्यवसाय संस्थेने विकसित केलेल्या "CHALO" या मोबाईल ॲप च्या सहाय्याने बसपास व तिकीट वितरण यंत्रणेचे अद्ययावतीकरण केलेले आहे. या प्रणालीअंतर्गत इलेक्ट्रॉनिक तिकीट इश्युइंग मशीनमध्ये (ETIM) रोख रकमेच्या सहाय्याने नियमित तिकीट / बसपास वितरणाबरोबरच, **<u>"CHALO" स्मार्टकार्ड</u>** आणि भ्रमणध्वनीच्या माध्यमातून तिकीट / बसपास वितरणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अन्य प्रवाशांप्रमाणेच दिव्यांग प्रवाशांना देखील नवीन "CHALO स्मार्टकार्ड" वितरीत करण्यात येत आहेत.

या अनुषंगाने बेस्ट उपक्रमाने यापूर्वी दिव्यांग प्रवाशांसह सर्व अन्य प्रवाशांना वितरीत केलेली RF-ID स्मार्टकार्डस् रद्द करण्यात येत आहेत. ज्या प्रवाशांनी ही प्रणाली सुरु करण्यापूर्वी म्हणजेच **<u>दि.२१.१२.२०२१ पूर्वी स्मार्टकार्ड</u>** घेतलेली असतील, त्यांच्या स्मार्टकार्डची वैधता **<u>दि.१०.०५.२०२२ पासून रद्द करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे</u>**. सबब, संबंधित प्रवाशांनी त्यांच्या स्मार्टकार्डवरील शिल्लक रकमेचा परतावा लवकरात लवकर बेस्ट उपक्रमाकडून करुन घ्यावा. तसेच दिव्यांग प्रवाशांनी देखील नवीन "CHALO स्मार्टकार्ड" लवकरात लवकर घ्यावीत.

या रकमेच्या परताव्याकरीता बेस्ट उपक्रमाला लेखी स्वरुपात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. हा अर्ज मूळ ट्रायमॅक्स आरएफआयडी कार्डसह उपक्रमाच्या नजिकच्या बसआगारात अथवा वडाळा आगार येथील नियोजन विभागात सादर करावा लागेल. अर्जदाराने अर्जामध्ये आपले संपूर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक नमूद करणे जरुरीचे आहे. अर्ज सादर केल्यापासून चार ते पाच कार्यालयीन दिवसात प्रवाशांशी संपर्क साधून शिल्लक रकमेचा परतावा जवळच्या आगारात करण्यात येईल. सर्व संबंधित प्रवाशांनी गैरसोय टाळण्याकरीता लवकरात लवकर आपल्या शिल्लक रकमेचा परतावा घ्यावा. दिनांक १०.०५.२०२२ पासून परतावा देणे बंद करण्यात येईल.

.....

Scanned with OKEN Scanner

३१५

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

मवराडे २९/४/२०२२
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.१०
दिनांक : २९.०४.२०२२

## इलेक्ट्रिक बसगाडयांच्या निविदेबाबत

मुंबई, २९ - काही समाजमाध्यमांवर एका व्हिडिओ क्लिपद्वारे इलेक्ट्रिक बसगाडयांच्या निविदेबाबत तथ्यहीन आणि चुकीची बातमी प्रसारित होत आहे. सदर निविदेची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसून निविदाधारकांकडून आलेल्या विनंतीनुसार त्यांच्यासोबत बैठका घेऊन जागतिक पातळीवरच्या जास्तीत जास्त व्यवसाय संस्थांना या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता यावा, यादृष्टीने बेस्ट उपक्रमाने सदर निविदा प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुलभ केली आहे, जेणेकरुन चांगले स्पर्धात्मक दर प्राप्त होतील आणि जास्तीत जास्त इलेक्ट्रिक वातानुकूलित बसगाडया मुंबईकरांसाठी उपलब्ध होतील.

याबाबत महाराष्ट्र टाइम्स, नवभारत टाइम्स, टाइम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, दिव्य भास्कर अशा विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरातीद्वारे तसेच महाटेंडर पोर्टलवरदेखील व्यापक प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे इच्छुक निविदाधारकांना याबाबत ईमेलद्वारेदेखील कळविण्यात आलेले आहे. निविदाकाराना निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरिता अजून संधी उपलब्ध आहे.

.....

Scanned with OKEN Scanner

३२५

**PRESS NOTE**

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

**प्रसिद्धी पत्रक**

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्त संपादक

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(सुरेश गायकवाड)
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.११
दिनांक : २०.०५.२०२२

बेस्ट उपक्रमाकडून पाठविण्यात येणा-या विजबिलांच्या लघुसंदेशाबाबत इशारा

मुंबई, २० - बेस्ट उपक्रमाच्यावतीने विजबिलाबाबतचे लघुसंदेश (SMS) नेहमीच कोणत्याही भ्रमणध्वनी क्रमांकावरुन न पाठविता "BESTSM" द्वारे पाठविले जातात. जर आपणास विजबिलांबाबत अथवा वीज पुरवठा खंडित करण्याबाबतचा लघुसंदेश "BESTSM" च्याऐवजी इतर कोणत्याही क्रमांकावरुन आल्यास व संपर्कासाठी मोबाईल क्रमांक देऊन संपर्क साधण्यास सांगितल्यास कृपया अशा प्रकारच्या संदेशांना प्रतिसाद देऊ नये.

अशा प्रकारे आपणास ऑनलाईन व्यवहार करण्यास प्रवृत्त करुन आपली फसवणूक केली जाऊ शकते.

सर्व वीजग्राहकांना या बाबत दक्षता घेण्याचे आवाहन बेस्ट उपक्रमाच्यावतीने करण्यात येत आहे.

.......

345

**PRESS NOTE**

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

**प्रसिद्धी पत्रक**

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक/वृत्त संपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र. १२
दिनांक : २५.०५.२०२२

## मुंबईकर जनतेसाठी बेस्टकडून खुशखबर

मुंबई, २५ - आज बुधवार दिनांक २५ मे २०२२ पासून बेस्ट उपक्रमाच्या वीजग्राहकांना त्यांच्या वीज देयकाचे प्रदान चलो ॲप द्वारे करता येईल. सुमारे १०.५० लाख वीज ग्राहकांना त्यांच्या वीज देयकाचे प्रदान सुलभ रीतीने करता यावे, या उद्देशाने बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाने चलो ॲप द्वारे वीज देयकाचे प्रदान करण्याची सोय बेस्ट उपक्रमाच्या वीजग्राहकांना आज पासून उपलब्ध केल्याची घोषणा केली आहे.

बेस्टच्या या नव्या निर्णयामुळे आता चलो ॲप वापरणाऱ्या सर्व वापरकर्त्यांना बेस्ट उपक्रमाच्या वीज देयकांचे प्रदान ऑनलाइन पद्धतीने करण्यासाठी चलो ॲपचा वापर करता येईल.

बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक श्री. लोकेश चंद्र यांनी असे सांगितले की, बेस्टचे चलो ॲप लोकांच्या सेवेत अर्पण केल्यापासून केवळ चार महिन्यांच्या कालावधीतच १५ लाख मुंबईकरांनी सदर ॲप डाऊनलोड करून त्याचा वापर करण्यास सुरुवात केलेली आहे. त्यामुळे चलो ॲप वापरकर्त्यांना वीज देयकाचे प्रदान करणे सुलभ आणि अधिक सोयीचे ठरणार आहे. बेस्ट उपक्रमाने चलो ॲप द्वारे सदर ऑनलाइन वीज देयक प्रदानाचा पर्याय वीज ग्राहकांसाठी खुला केल्यामुळे त्यांना यापुढे वीज देयकाचे प्रदान करण्यासाठी बेस्ट उपक्रमाच्या वीज देयक भरणा केंद्रावर जाण्याची गरज भासणार नाही. त्यांनी पुढे असे सांगितले की, वीज ग्राहकांनी चलो ॲपच्या मेनूबार वर जाऊन वीज देयकाचा पर्याय निवडावा. नंतर त्यांचा वीज ग्राहक क्रमांक त्या ठिकाणी नोंद केल्यावर ऑनलाइन वीज देयकाचे प्रदान करता येऊ शकते.

बेस्ट उपक्रमाने बेस्ट चलो ॲप द्वारे बेस्ट चलो स्मार्ट कार्डच्या रिचार्ज ची सुविधादेखील उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे चलो ॲपच्या वापरकर्त्यांना आता त्यांचा कार्ड क्रमांक नोंद करून कार्ड टॉप अप करता येऊ शकते. त्यानंतर सदर ऑनलाईन रिचार्ज केलेले कार्ड बस वाहकाच्या मशीन द्वारे ॲक्टिव्हेट करता येईल. बेस्ट उपक्रमाने मुंबईकर जनतेसाठी डिजिटल सेवेचे लोकार्पण करताना बेस्ट चलो ॲप बेस्ट चलो कार्ड आणि नवीन ७२ प्रकारच्या बेस्ट सुपर सेवर वाहतूक योजना पुढे चला या मार्केटिंग मोहिमेद्वारे प्रवाशांच्या सेवेकरिता जारी केल्या आहेत. सदर विविध पर्यायांना प्रचंड प्रतिसाद देताना १५ लाख मुंबईकर जनतेने बेस्ट चलो ॲप डाउनलोड केले असून दोन लाखांपेक्षा अधिक मुंबईकरांनी बेस्ट चलो कार्ड खरेदी केली आहे.

अलीकडेच लोकार्पित केलेल्या भारतातील पहिल्या डिजिटल वाहतूक सेवेच्या म्हणजेच एनसीएमसी कार्डच्या दाखल होण्यामुळे बेस्ट उपक्रम ही सार्वजनिक परिवहन सेवेमधील एक अग्रगण्य सार्वजनिक परिवहन संस्था ठरली आहे. आपल्या डिजिटल सुविधेमुळे मुंबईकर जनतेचा प्रवास सुखकर करण्यासोबतच जास्तीत जास्त मुंबईकरांना सार्वजनिक परिवहन सेवेकडे आकर्षित करण्याचा बेस्टचा मानस आहे. यापुढे तिकिटांच्या कागदावर होणारा खर्च तसेच रोख रक्कम हाताळणीचा खर्च देखील कमी करण्याचे बेस्टचे उद्दिष्ट आहे.

........

Scanned with OKEN Scanner

३६०५

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्त संपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

प्रस्तुत वर १३
०१/६/२०२२

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.१३
दिनांक : ०१.०६.२०२२

**'बेस्ट' चे नवे सहायक महाव्यवस्थापक (विद्युत पुरवठा)**

मुंबई, ०१ - बेस्ट उपक्रमाचे म्हणून सहायक महाव्यवस्थापक (विद्युत पुरवठा) श्री. हर्षद वगळ यांची नुकतीच नेमणूक करण्यात आली आहे. श्री. वगळ यांनी विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी संपादन केली असून १९८८ साली बेस्ट उपक्रमामध्ये उप अभियंता या पदावर ते रुजू झाले होते.

यापूर्वी त्यांनी बेस्ट उपक्रमाच्या उप महाव्यवस्थापक (विद्युत पुरवठा) यांचे कार्यालय, ग्राहक सेवा, संगणक उपयोजकता, नियोजन, उभारणी, प्रवर्तन व परिरक्षण इत्यादी विभागांमध्ये विविध पदांवर काम केले आहे.

........

Scanned with OKEN Scanner

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्त संपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.१४
दिनांक : ०२.०६.२०२२

# वीज ग्राहकांना आवाहन

पावसाळयात घ्यावयाची काळजी

मुंबई, ०२ - मुंबईत पावसाळयामध्ये विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे तसेच वीजेचा धक्का बसून अपघात होण्याची शक्यता असते. अशा समस्यांचा सामना करण्यासाठी बेस्ट उपक्रम फक्त प्रतिबंधात्मक उपाय योजनाच करत नाही, तर आपल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जागोजागी अतिरिक्त कर्मचा-यांची नेमणूक करते. पावसाळयामध्ये अनेक ठिकाणी पाणी साठणे व वाहतुकीची कोंडी होणे यामुळे खंडीत विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी विलंब होऊ शकतो..

ग्राहकांच्या तक्रारींच्या निवारणार्थ बेस्ट उपक्रमातर्फे आठवडयाच्या सर्व दिवशी रात्रंदिवस (२४ तास) 'वितळतार नियंत्रण कक्ष' (फ्युज कंट्रोल) कार्यरत आहेत. सदर नियंत्रण कक्षात तक्रार नोंदवताना वीजग्राहकांनी त्यांचा वीजग्राहक क्रमांक अथवा वीजमापक (Meter) क्रमांक नोंदवावा. वितळतार नियंत्रण कक्षाचे (फ्युज कंट्रोल) दूरध्वनी क्रमांक विजदेयकावर छापलेले आहेत. वीजग्राहक क्रमांक हा नऊ आकडी (उदाहणार्थ १००-०२६-०८९*० असा) असून, विद्युत देयकाच्या अगदी वरील बाजूस उजव्या कोप-यात छापलेला आहे. तसेच वीजमापक (Meter) क्रमांक हा विद्युत देयकाच्या मागील बाजूस, मध्यभागी असलेल्या टेबलच्या पहिल्या रकाण्यात दर्शविण्यात येतो. या दोन पैकी एक क्रमांक तक्रार नोंदविताना आपल्या जवळ बाळगावा, जेणे-करुन तक्रारीचे निवारण जलद गतीने करता येईल. वीज ग्राहक त्यांच्या वीज पुरवठाबाबतच्या तक्रारी 'MiBest' या ॲपवर नोंदवू शकतात. सदरचे ॲप वीज ग्राहक त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी (मोबाईल क्रमांक) क्रमांकावर गुगल प्ले स्टोअर आणि ॲपल ॲप स्टोअर वरुन डाऊनलोड करु शकतात.

वीजग्राहक त्यांच्या सदनिकांच्या खंडीत विद्युत पुरवठा विषयीच्या तसेच विजेच्या ठिणग्या उडणे, शॉक लागणे, आग लागणे इ.तक्रारी वितळतार नियंत्रण कक्षात नोंदवू शकतात. विभागनिहाय वितळतार नियंत्रण कक्षाचे (फ्युज कंट्रोल) दूरध्वनी क्रमांक खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत.

...२......

Scanned with OKEN Scanner

## वितळतार नियंत्रण कक्ष (फ्युज कंट्रोल) दूरध्वनी क्रमांक (२४ तास उपलब्ध)

| | वितळतार नियंत्रण कक्षाचे नाव | विभाग | दूरध्वनी क्र ☎ | व्हॉटसअप नंबर |
|---|---|---|---|---|
| उत्तर विभाग | फ्युज कंट्रोल दादर | सायन (पूर्व), वडाळा अ‍ॅन्टॉप हिल, माटुंगा (पूर्व),दादर (पूर्व) | २४१२४९९३<br>२४१२४२४२<br>७२०८९३४७३५ | ८८२८८४७५६३ |
| | फ्युज कंट्रोल वरळी | प्रभादेवी, ताडदेव, एन.एम.जोशी मार्ग, वरळी,शिवाजीपार्क(पूर्व),हाजिअली ,लोअर परेल (पश्चिम) | २४९५४२४२<br>२४९५३३६३ | ८८२८८४७५६७ |
| | फ्युज कंट्रोल माहीम/धारावी | सितला देवी टेम्पल, धारावी, एस.व्ही.एस मार्ग, माटुंगा (पश्चिम), कोहीनूर मिल, माहिम, टिळक ब्रिज डावी बाजू, धारावी, कटारीया ब्रिज, | २४३१४२४०<br>२४३१४२४२ | ८८२८८७१६५७ |
| | फ्युज कंट्रोल सुपारीबाग | आचार्य दोंदे मार्ग (द), एलफिन्स्टन (पूर्व), शिरोडकर मंडई फुटपाथ, शिवडी स्टेशन (पूर्व), बोरजेरा रोड, माझगाव, मध्य मुंबई (पूर्व), लालबाग, काळाचौकी, भायखळा, सातरस्ता, बावला मस्जिद, एन.एम.जोशी मार्ग (काही भाग) | २४११४२४२<br>२४१६१२१७<br>२४११७७३४<br>२४११७७३६ | ८८२८८७१६४१ |
| दक्षिण विभाग | फ्युज कंट्रोल कुलाबा | वेंकवे, नरीमन पॉईंट, हुतात्मा चौक, फोर्ट,क्रॉफर्ड मार्केट | २२१८४२४२<br>२२१५६७४९ | ८८२८८७१६४९ |
| | फ्युज कंट्रोल पाठकवाडी | गिरगांव, काळबादेवी, भेंडीबाजार, चिराबाजार,एल.टी. पोलीस स्टेशन, खेतवाडी (काही भाग) | २२०८४२४२<br>२२०८४२४३<br>२२०६६३५१ | ८८२८८४७५६५ |
| | फ्युज कंट्रोल मस्जिद | मस्जिद बंदर, माझगांव | २३४७४२४२<br>२३४५४२९७<br>२३४७४०१० | ८८२८८७१६५० |
| | फ्युज कंट्रोल ताडदेव | मध्य मुंबई,नागपाडा, जे.जे. हॉस्पिटल, ऑपेरा हॉऊस, नेपियन्सी रोड, ब्रिच कॅन्डी हॉस्पिटल, महालक्ष्मी, हाजिअली, पांडे कंपाऊंड | २३०९४२४२<br>२३०१८१६९<br>७२०८९६४०९२ | ८८२८८७१६४७ |

वितळतार नियंत्रण कक्ष (फ्युज कंट्रोल) आणि प्रवर्तन आणि परिरक्षण विभागांच्या सीमा दाखविणारा नकाशा सोबत जोडला आहे.

पावसाळयामध्ये वीजेचा धक्का बसू नये अथवा इतर अपघात घडू नयेत यासाठी बेस्ट उपक्रमाने खाली दिल्याप्रमाणे 'काय करावे' व 'काय करु नये' या संबंधी मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन उपक्रमास बहुमोल सहकार्य करावे अशी विनंती.

...३

Scanned with OKEN Scanner

८३५



## वीजग्राहकांनो हे करा

१. पावसाच्या पाण्यापासून वीजमापक व संच मांडणीचा बचाव करण्याकरता वीजमापक केबिन सिमेंटने बांधून घ्या, तसेच केबिन जमिनीपासून उंचावर बांधा जेणे करुन त्यात पावसाचे पाणी गळणार/शिरणार नाही. केबिन लाकडी असल्यास ती योग्य प्रकारे सुरक्षित करा.

२. परवानाधारक विद्युत ठेकेदाराकडून आपल्या वीजमापकांच्या केबिनपासून घरापर्यंतचे वायरिंग तसेच घरातील विद्युत उपकरणांचे वायरिंग व विद्युत संचमांडणी तपासून घ्या. तसेच आपल्या संच मांडणीमध्ये योग्य रेटींगच्या इएलसीबीचा वापर करा.

३. अतिवृष्टीच्यावेळी किंवा वीजमापक केबिनमध्ये पाणी गळू लागल्यास किंवा पाणी शिरले असता, आपल्या घरातील वीजेचे मुख्य स्वीच बंद करा. विद्युत संच मांडणीतील त्रुटी पूर्णपणे दूर झाल्यानंतर तसेच परवानाधारक विद्युत कंत्राटदाराने अथवा बेस्ट उपक्रमाच्या कर्मचा-यांने सुरक्षिततेची खात्री दिल्यानंतरच वीज पुरवठा सुरु करा.

४. वीजमापकांची केबिन, मार्गप्रकाश दिव्यांचे खांब, लाल रंगाचा वीज वितरण स्तंभ (डिस्ट्रिब्युशन पिलर्स) या मधून ठिणग्या पडत असतील किंवा त्या व्दारे वीजेचा धक्का लागत असेल ,तर संबंधित फ्युज नियंत्रण कक्षाशी तात्काळ संपर्क साधा.

५. विशेषत: ज्या सदनिकांना/घरांना अथवा इमारतींना तात्पुरता पुरवठा देण्यात आला आहे त्यांनी फक्त अत्यावश्यक विद्युत उपकरणांचा वापर करावा.

...४....

Scanned with OKEN Scanner

**हे करु नका**

१. वीजमापकांच्या केबिनमध्ये पाणी गळत असल्यास हातमोजे, रबरी बूट, लाकडी अथवा इन्सूलेटेड प्लॅटफार्मचा वापर केल्याशिवाय संच मांडणीस ओलसर अथवा सुरक्षा उपकरणे/रबरी हातमोजे घातल्याशिवाय स्पर्श करु नका.

२. कोणत्याही परिस्थितीत विजेची ठिणगी पडत असेल तसेच पाणी ठिबकत/गळत असेल तर मार्गप्रकाश स्तंभांना, रस्त्यावर असणा-या लाल रंगाच्या डिस्ट्रिब्युशन पिलर्स व केबिनमधील वीजमापकांना स्पर्श करु नका.

पावसाळयात वीजग्राहकांना सर्वतोपरी मदत मिळावी या करता बेस्ट उपक्रमाने आवश्यक ती तयारी केली आहे. वीजग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी बेस्टतर्फे सर्व उपाय योजना करण्यात आल्या आहेत. प्रसंगी खबरदारीचे उपाय म्हणून बेस्टला वीज पुरवठा बंद करावा लागतो या काळात येणा-या तक्रारींचे प्रमाण आणि स्वरुप तसेच पाणी तुंबल्यामुळे जमिनीखालील तारखंडांमधील बिघाड शोधण्यास होणारा विलंब आणि कर्मचा-यास कामावर हजर राहण्यास येणा-या अडचणी लक्षात घेऊन वीज ग्राहकांनी अशा आणिबाणीच्या काळात कर्मचारी वर्गाला सहकार्य करावे, असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात येत आहे.

.........

Scanned with OKEN Scanner

४६४


# PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.


संपादक / वृत्त संपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
। जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.१५
दिनांक : १५.०६.२०२२

विषय : बेस्ट उपक्रम महापालिकाकरण, अमृत महोत्सव (७५ वे वर्ष)
बेस्ट वार्ता - बेस्ट दिन विशेषांक २०२२ करिता लेख / साहित्य

मुंबई, १५ - बेस्ट उपक्रमाच्या महापालिकाकरणास दिनांक ७ ऑगस्ट २०२२ रोजी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत.

अमृत महोत्सवी सोहळयाचा भाग म्हणून उपक्रमाने बेस्ट वार्ता या आपल्या मुखपत्राचा बेस्ट दिन विशेषांक प्रसिध्द करण्याचे ठरविले आहे.

त्या अनुषंगाने सर्व माजी बेस्ट समिती अध्यक्ष, बेस्ट समिती सदस्य, सर्व माजी महाव्यवस्थापक, सर्व आजी माजी महापालिका आयुक्त , प्रथितयश कलाकार, खेळाडू, इतर मान्यवर, मुंबईचे नागरिक प्रवासी संघटना तसेच उपक्रमाचे माजी कर्मचारी / अधिकारी यांनी बेस्टबद्दलचे आपले अनुभव, आठवणी आदि साहित्य मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत सुमारे तीनशे शब्दात लिहून जनता संपर्क अधिकारी, बेस्ट उपक्रम, बेस्ट भवन, मुंबई – ४०० ००१ यांच्याकडे ईमेलद्वारे (probestundertaking@gmail.com) दिनांक ३० जून २०२२ पर्यंत पोहोचेल अशा बेताने पाठवावे अशी विनंती करण्यात येत आहे.

Press Note No.15
Date :15.06.2022

## CONTRIBUTION TO BEST VARTA-BEST DIN VISHESHANK

Mumbai,15 - The BEST Undertaking will be completing 75 years of its municipalisation on 7th August, 2022.

As a part of the Platinum Jubilee Celebrations, the Undertaking is going to publish a special issue of its house magazine ' BEST Varta'.

The Undertaking invites Ex-Chairmen, Ex-General Managers, Ex-Municipal Commissioners, well known artists, players other dignitaries, the citizens of Mumbai as well as the former employees/officers to send us interesting stories or anecdotes/reminiscences about their association with or their experiences of the organization. writings, either in Marathi, Hindi or English should be approximately 300 words, and should reach the Public Relations Officers, BEST Undertaking, BEST Bhavan, Colaba, Mumbai 001 through email (probestundertaking@gmail.com) on or before 30th June 2022.

====

Scanned with OKEN Scanner

५८५

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्त संपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.१६
दिनांक : १६.०६.२०२२

विषय : 'बेस्ट'द्वारे खाजगी शालेय आणि कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता विशेष सवलतीचा बसपास

मुंबई, १६ – बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकरिता स्मार्ट कार्ड तसेच मोबाईल ॲपद्वारे मोफत प्रवासाची सुविधा बेस्ट उपक्रमाने उपलब्ध करुन दिली आहे.

परंतू, खाजगी शाळांच्या विद्यार्थ्यांकरिता अशा प्रकारची कोणतीही सुविधा नव्हती. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मान.श्री.उध्दवजी ठाकरे यांच्या आदेशानुसार खाजगी शाळांमधील आणि कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता इयत्ता ५ वी पर्यंत रु.२००/-, इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंत रु.२५०/- आणि इयत्ता ११ वी, १२ वी आणि पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता रु.३५०/- इतक्या सवलतीच्या दरामध्ये नवीन बसपास योजनेअंतर्गत (वातानुकूलित / विना वातानुकूलित) सुविधा बेस्ट उपक्रमाद्वारे देण्यात येत आहे.

सदर सुविधेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी ऑन लाईन म्हणजेच ॲपद्वारे तसेच ऑफलाईन देखील अर्ज करु शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना आगारात येण्याची गरज भासणार नाही. या योजनेची संपूर्ण माहिती बेस्ट उपक्रमाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तरी,सदर सवलतीच्या बसपास योजनेचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात येत आहे.

......

Scanned with OKEN Scanner

६७५

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्त संपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

मनोज वराडे

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.१७
दिनांक : १६.०६.२०२२

## बसथांब्यावर जाहिराती प्रसिध्द करण्याबाबत

मुंबई, १६ - बेस्टच्या बसथांब्यांवर जाहिराती प्रसिध्द करण्याविषयी मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये घोटाळा झाल्याबाबतच्या बातम्या काही वृत्तवाहिन्यांवर प्रसारित करण्यात येत आहेत. सदर वृत्तवाहिन्यांनी बेस्ट उपक्रमाकडे याबाबत कोणत्याही प्रकारे संपर्क साधलेला नाही.

परंतू, याबाबतीत होणा-या आरोपांमध्ये काहीही तथ्य नसून पूर्णपणे खोटी बातमी आहे. या निविदेबद्दल कोणताही कार्यादेश देण्यात आलेला नाही. बेस्ट उपक्रमातर्फे राबविण्यात येणारी प्रत्येक निविदा प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसारच राबविण्यात येते. त्यामुळे अशा प्रकारच्या खोट्या आणि तथ्यहीन आरोप करणा-या अफवांवर विश्वास न ठेवता प्रसार माध्यमांनी कृपया, बेस्ट उपक्रमाकडून याबाबत शहानिशा करुन घ्यावी असे विनंती वजा आवाहन बेस्ट उपक्रमामार्फत करण्यात येत आहे.

......

Scanned with OKEN Scanner

६३५

**PRESS NOTE**

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

**प्रसिद्धी पत्रक**

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई ४०० ००१.

संपादक / वृत्त संपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.१८
दिनांक : १७.०५.२०२२

## बसथांब्यांचे सुशोभिकरण

मुंबई, १७ - बेस्ट उपक्रमाने नेहमीच मुंबईकर जनतेचा प्राधान्याने विचार केला आहे. मुंबईकरांना प्रवास सुलभ आणि सुखकर होण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम सातत्याने राबविले आहेत. याचाच एक भाग म्हणून अलिकडे महालक्ष्मी रेसकोर्स येथे एका आगळ्यावेगळ्या बसथांब्याची रचना नमुना दाखल करण्यात आली होती.

या बसथांब्याला मुंबईकरांची पसंती मिळाल्यामुळे बेस्ट उपक्रमाने अशाच प्रकारचे ३५० बसथांबे विकसित करण्याचे काम सुरु केले आहे. सदर कामासाठी लागणारा निधी महाराष्ट्र राज्याचे पर्यटन, पर्यावरण आणि राजशिष्टाचार मंत्री मान.आदित्य ठाकरे यांच्या जिल्हा नियोजन आणि विकास समितीच्या निधीतून उपलब्ध होणार आहे.

याशिवाय आणखी १००० बसथांब्यांचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे. अशाप्रकारे येत्या ६ ते ८ महिन्याच्या कालावधीत मुंबईतील जवळपास सर्वच बसथांबे पर्यावरणस्नेही आणि आकर्षक स्वरुपाचे असतील जेणेकरुन सदर बसथांब्यांवर बसगाडयांच्या प्रतिक्षेत थांबणा-या प्रवाशांना एक सुखद अनुभव बेस्ट उपक्रमाद्वारे देण्याचा विचार आहे.

मुंबईच्या सौंदर्यात भर घालणा-या या उपक्रमाच्या मदतीसाठी विविध कॉर्पोरेट हाऊसेस, बँका, उत्पादक संस्था, प्रसार माध्यम संस्था, तसेच अन्य व्यवसाय संस्थांनी त्यांच्या कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंडाद्वारे या नवीन बसथांब्याच्या बांधकाम व देखरेखीसाठी सहकार्य करावे असे बेस्ट उपक्रमाद्वारे आवाहन करण्यात येत आहे. अशा व्यवसाय संस्थांना बेस्ट उपक्रमाद्वारे जाहिरात दरांमध्ये सवलत देण्यात येणार आहे.

.....

Scanned with OKEN Scanner

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

मसुवराडे 30/06/2022
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.१९
दिनांक : ३०.०६.२०२२

**शुक्रवार, दि.०१.०७.२०२२ पासून अंमलात येणारे बेस्ट उपक्रमाच्या बसप्रवर्तनातील बदल.**

मुंबई, ३० - बेस्ट उपक्रमाच्या बसप्रवर्तनामध्ये **शुक्रवार, दि.१ जुलै २०२२** पासून काही बदल करण्यात येत आहेत.यामध्ये काही बसमार्गांच्या प्रवासमार्गात बदल करण्यात येणार असून काही बसमार्गाचे प्रवर्तन विस्तारीत करण्यात येणार आहे.तसेच काही बसमार्गावरील प्रवर्तन समाधानकारक प्रतिसादाअभावी रद्द करण्यात येणार आहे अथवा अन्य समांतर बसमार्गामध्ये विलिन करण्यात येणार आहे.

**बसप्रवर्तनातील बदलांबाबतचा विस्तृत तपशील पुढीलप्रमाणे आहे.**

१. **बसमार्ग क्र.सी-५४**– वरळी आगार आणि ऐरोली बसस्थानक दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे वांद्रे-कुर्ला संकुल येथून छेडानगर दरम्यान कुर्ला आगार मार्गे असलेले प्रवर्तन वांद्रे-कुर्ला संकुल आणि एव्हरार्डनगर यांना जोडणा-या मार्गावरुन परावर्तित करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) वरळी आगार | ६.०० | २१.०० | १२ ते १८ |
| ब) ऐरोली बसस्थानक | ७.३० | २२.५० | |

२. **बसमार्ग क्र.सी-३०५**– बॅकबे आगार आणि धारावी आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे पं. पलुस्कर चौक आणि वत्सलाबाई देसाई चौक दरम्यान वसंतराव नाईक चौक (ताडदेव) मार्गे असलेले प्रवर्तन गोपाळराव देशमुख मार्ग (पेडर रोड) मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) बॅकबे आगार | ८.३० | २१.४० | १३ ते १८ |
| ब) धारावी आगार | ७.०० | २०.०० | |

३. **बसमार्ग क्र.३१९**– कुर्ला स्थानक (प) आणि मजास आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे मरोळ आगार आणि नमस्कार जंक्शन दरम्यान सीप्झ मार्गे असलेले प्रवर्तन शांतीनगर, होली स्पिरीट रुग्णालय मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) कुर्ला स्थानक (प) | ६.०० | २०.३५ | २६ ते २८ |
| ब) मजास आगार | ५.१५ | १९.२५ | |

......२

Scanned with OKEN Scanner

४. **बसमार्ग क्र.ए-३३४**– घाटकोपर स्थानक (प) आणि मरोळ आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे घाटकोपर स्थानक आणि जांभूळपाडा दरम्यान माणिकलाल महापालिका शाळा मार्गे असलेले प्रवर्तन गोळीबार मार्गावरुन परावर्तित करण्यात येत आहे

| प्रस्थानस्थान | घाटकोपर स्थानक (प) ते मरोळ आगार दरम्यानचे प्रवर्तन | | मरोळ आगार ते जांभूळपाडा दरम्यानचे प्रवर्तन | |
|---|---|---|---|---|
| | पहिली बस(वेळ) | शेवटची बस(वेळ) | पहिली बस(वेळ) | शेवटची बस(वेळ) |
| अ) घाटकोपर स्थानक (प) | ६.२५ | २२.१० | ——— | |
| ब) मरोळ आगार | ६.०० | २१.३० | ७.०३ | १९.५४ |
| क) जांभूळपाडा | ——— | | ७.३३ | २०.२९ |

५. **बसमार्ग क्र.ए-३८३**–गडकरी खाण आणि शिवाजीनगर आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे डॉ. आंबेडकर उद्यान / चेंबूर स्थानक व शांतीबाग दरम्यान 'डाऊन' दिशेने चेंबूर रोड क्र.१८, सांडू उद्यान मार्गे असलेले प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग डॉ. आंबेडकर उद्यान / चेंबूर स्थानक येथून सावन बाजार मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) गडकरी खाण | ६.२० | २२.४५ | १४ ते २२ |
| ब) शिवाजीनगर आगार | ५.३५ | २२.०० | |

६. **बसमार्ग क्र.४४६**–कुर्ला स्थानक (प) आणि बामनदयापाडा दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे डॉ. दत्ता सामंत चौक (साकीनाका) व बोरोसिल ग्लास फॅक्टरी दरम्यान मरोळ नाका, मरोळ-मरोशी बसस्थानक मार्गे असलेले प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग डॉ. दत्ता सामंत चौक (साकीनाका) येथून मरोळ भवन, मकवाना मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) कुर्ला स्थानक (प) | ६.३० | २१.२० | १८ ते ३२ |
| ब) बामनदयापाडा | ६.३५ | २२.१० | |

७. **बसमार्ग क्र.४६४ मर्या.**–घाटकोपर बसस्थानक आणि गोरेगांव आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा सेंटर व गोरेगांव आगार दरम्यान बेहराम बाग मार्गे असलेले प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा सेंटर, महानंदा दुग्धशाळा, मृणाल गोरे उड्डाणपुल मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) गोरेगांव आगार | ६.३० | २१.३० | २४ ते २८ |
| ब) घाटकोपर बसस्थानक | ७.५० | २३.०० | |

८. **बसमार्ग क्र.३९**–वीर हुतात्मा भाई कोतवाल उद्यान (प्लाझा) आणि आगरकर चौक दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचा आगरकर चौक (अंधेरी-पूर्व) येथून मरोळ आगारापर्यंत विस्तार करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) वीरहुतात्माभाई कोतवाल उद्यान | ७.३० | २१.३० | २७ ते ३५ |
| ब) मरोळ आगार | ६.१५ | २०.०० | |

...३....

Scanned with OKEN Scanner

९. **बसमार्ग क्र.८० मर्या.**–वाळकेश्वर आणि माहीम बसस्थानक दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचा माहीम बसस्थानक येथून वांद्रे आगारापर्यत विस्तार करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) वांद्रे आगार | ६.४० | २०.२० | २५ ते ३६ |
| ब) वाळकेश्वर | ८.०५ | २२.०० | |

१०. **बसमार्ग क्र.८६**–बॅकबे आगार आणि वांद्रे रेक्लमेशन बसस्थानक दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचावांद्रे रेक्लमेशन बसस्थानक येथून हिल रोड मार्गे वांद्रे आगारापर्यत विस्तार करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) बॅकबे आगार | ७.३५ | २२.४५ | १० ते १७ |
| ब) वांद्रे आगार | ६.२० | २०.५० | |

११. **बसमार्ग क्र.ए-३४५**–संतोषनगर (विस्तारीत) आणि प्रबोधनकार ठाकरेनगर (चारकोप) बसस्थानक दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे प्रवर्तन **संपूर्ण दिवस गोराई आगारपर्यत विस्तारीत** करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) संतोषनगर (विस्तारीत) | ६.१५ | २३.३५ | ११ ते १४ |
| ब) गोराई आगार | ५.२० | २२.३० | |

१२. **बसमार्ग क्र.४२३**–मुलुंड (प) चेकनाका बसस्थानक आणि म्हाडा वसाहत (चांदिवली) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचा म्हाडा वसाहत (चांदिवली) येथून अमृतशक्ती, नहार इस्टेट मार्गे संघर्षनगर (चांदिवली) पर्यत विस्तार करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) मुलुंड(प) चेकनाका बसस्थानक | ५.४५ | २३.३० | २२ ते २७ |
| ब) संघर्षनगर (चांदिवली) | ६.४० | २४.२० | |

१३. **बसमार्ग क्र.ए-४४९**–बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा सेंटर आणि गोरेगांव बसस्थानक (पूर्व) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचागोरेगांव बसस्थानक (पूर्व) येथून अमृतवन संकुल, शशी मंगलम विद्यालय व आबा करमरकर मार्गे दिंडोशी बसस्थानकपर्यत विस्तार करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा सेंटर | ६.०० | २२.३० | १२ ते २० |
| ब) दिंडोशी बसस्थानक | ५.३५ | २२.०० | |

१४. **बसमार्ग क्र.ए-२६३**–या नवीन वातानुकूलित बसमार्गाचे प्रवर्तन गोरेगांव बसस्थानक (प) आणि अय्यप्पा मंदिर दरम्यान बांगूरनगर मार्गे वर्तुळाकार सेवेत कार्यान्वित करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| गोरेगांव बसस्थानक (प) | ६.०० | २१.३० | १६ ते २१ |



Scanned with OKEN Scanner

१५. बसमार्ग क्र.ए-४५४ या नवीन वातानुकूलित बसमार्गाचे प्रवर्तन नाहूर बसस्थानक आणि मुलुंड रेल्वे स्थानक (प) दरम्यान पं. मदनमोहन मालवीय मार्ग, पार्श्वनाथनगर, नहारपाडा मार्गे कार्यान्वित करण्यात येत आहे

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) नाहूर बसस्थानक | ६.१५ | २२.०० | ११ ते १३ |
| ब) मुलुंड रेल्वे स्थानक (प) | ६.०५ | २१.४५ | |

१६. बसमार्ग क्र.५१४ मर्या. या नवीन बसमार्गाचे प्रवर्तन मुलुंड आगार आणि ऐरोली बसस्थानक दरम्यान मुलुंड मलापाडा, भांडुप पंपिंग केंद्र, ऐरोली सेक्टर ५ मार्गे कार्यान्वित करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) मुलुंड आगार | ६.१० | २२.१० | ३० ते ३८ |
| ब) ऐरोली बसस्थानक | ६.३५ | २२.४२ | |

१७. बसमार्ग क्र.१६५ कस्तुरबा गांधी चौक (सी. पी. टँक) आणि वडाळा आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचेखोदादाद सर्कल (दादर कार्यशाळा) व वडाळा आगार दरम्यानचे प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग खोदादाद सर्कल (दादर कार्यशाळा) येथून वडाळा चर्च, डॉन बॉस्को हायस्कुल मार्गे माहेश्वरी उद्यान येथे समाप्त करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) कस्तुरबा गांधी चौक(सी.पी.टँक) | ५.५० | २४.४० | २८ ते ३५ |
| ब) माहेश्वरी उद्यान | ५.०० | २३.३५ | |

१८. बसमार्ग क्र.३५४ वडाळा आगार आणि कन्नमवारनगर-२ दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे खोदादाद सर्कल (दादर टी.टी.) व वडाळा आगार दरम्यानचे प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग खोदादाद सर्कल (दादर टी.टी.) येथून वीर हुतात्मा भाई कोतवाल उद्यान (प्लाझा), प्रबोधनकार ठाकरे चौक (पोर्तुगीज), प्रभादेवी मार्गे वरळी आगार येथे समाप्त करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) वरळी आगार | ५.०० | २१.२० | १८ ते २७ |
| ब) कन्नमवारनगर-२ | ६.०० | २२.३० | |

१९. बसमार्ग क्र.ए-३८१ या बसमार्गाचे प्रवर्तन पुढीलप्रमाणे दोन टप्प्यात प्रवर्तित करण्यात येत आहे.

(१) घाटकोपर बसस्थानक ते टाटा वीज केंद्र (चेंबूर)

(२) घाटकोपर रेल्वे स्थानक (पूर्व) ते टाटा वीज केंद्र (चेंबूर)

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) घाटकोपर बसस्थानक | ५.०० | २१.५५ | १७ ते २३ |
| ब) टाटा वीज केंद्र (चेंबूर) | ७.०५ | २३.३५ | |
| क) घाटकोपर रेल्वे स्थानक(पूर्व) | ६.४० | २२.५० | |
| ड) टाटा वीज केंद्र (चेंबूर) | ५.५० | २३.०० | |



Scanned with OKEN Scanner

२०. बसमार्ग क्र.ए-४३०–या बसमार्गाचे प्रवर्तन पुढीलप्रमाणे दोन टप्प्यात प्रवर्तित करण्यात येत आहे.

(१) घाटकोपर आगार ते माहुलगांव,

(२) घाटकोपर रेल्वे स्थानक (पूर्व) ते माहुलगांव

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) घाटकोपर आगार | ५.४५ | २१.४५ | |
| ब) माहुलगांव | ७.५० | २३.५५ | १० ते २९ |
| क) घाटकोपर रेल्वे स्थानक(पूर्व) | ६.३५ | २३.१० | |
| ड) माहुलगांव | ६.०० | २२.३० | |

२१. बसमार्ग क्र.ए-४८१–या बसमार्गाचे प्रवर्तन पुढीलप्रमाणे दोन टप्प्यात प्रवर्तित करण्यात येत आहे.

(१) घाटकोपर बसस्थानक ते वाशीनाका एमएमआरडीए वसाहत

(२) घाटकोपर रेल्वे स्थानक (पूर्व) ते वाशीनाका एमएमआरडीए वसाहत

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) घाटकोपर बसस्थानक | ६.१० | २०.४० | |
| ब) वाशीनाका एमएमआरडीए वसाहत | ८.०५ | २१.४० | ३८ |
| क) घाटकोपर रेल्वे स्थानक(पूर्व) | ७.३० | २०.३५ | |
| ड) वाशीनाका एमएमआरडीए वसाहत | ६.५० | १९.५५ | |

२२. बसमार्ग क्र.सी-५१३–मुलुंड आगार आणि वाशी रेल्वे स्थानक दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे मुलुंड न्यायालय व गव्हाणपाडा दरम्यान निलमनगर, गव्हाणपाडा, अग्निशमन केंद्र मार्गे असलेले प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग मुलुंड न्यायालय आणि गव्हाणपाडा दरम्यान थेट जटा शंकर डोसा व वासुदेव बळवंत फडके मार्गाने प्रवर्तित होईल.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) मुलुंड आगार | ५.२५ | २२.३० | ११ ते १९ |
| ब) वाशी रेल्वे स्थानक | ६.२० | २३.३० | |

२३. बसमार्ग क्र.सी-२१–इलेक्ट्रिक हाऊस आणि अणुशक्तीनगर बसस्थानक दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे 'ए.सी.२६' मध्ये रुपांतर करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) इलेक्ट्रिक हाऊस | ८.०० | २०.३० | २५ ते ३२ |
| ब) अणुशक्तीनगर बसस्थानक | ७.०० | १९.०० | |

... ६....

Scanned with OKEN Scanner

२४. बसमार्ग क्र.६२–वीर हुतात्मा भाई कोतवाल उद्यान (प्लाझा) आणि विद्याविहार बसस्थानक (प) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे प्रवर्तन पं. पलुस्कर चौक (ऑपेराहाऊस) व विद्याविहार बसस्थानक (प) दरम्यान जसलोक रुग्णालय, आचार्य अत्रे चौक, श्री सिध्दीविनायक मंदिर, राम गणेश गडकरी चौक, वांद्रे-कुर्ला संकुल मार्गे पुनःस्थापित करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) पं.पलुस्कर चौक(ऑपेराहाऊस) | ७.४५ | १९.४० | २५ ते ४२ |
| ब) विद्याविहार बसस्थानक | ६.३० | २०.२० | |

२५. बसमार्ग क्र.४२९–घाटकोपर स्थानक (प) आणि मिलिंदनगर दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे प्रवर्तन पुनःस्थापित करण्यात येत आहे.

| प्रस्थानस्थान | पहिली बस (वेळ) | शेवटची बस (वेळ) | प्रस्थानांतर (मिनिटे) |
|---|---|---|---|
| अ) घाटकोपर स्थानक (प) | ७.०० | २१.०० | २८ ते ४७ |
| ब) मिलिंदनगर | ७.४० | २१.४० | |

२६. अतिरिक्त बसफे-यांचे प्रवर्तन कार्यान्वित–

बसमार्गावरील प्रवाशांचा वाढता प्रतिसाद विचारात घेऊन प्रवाशांच्या सोयीकरीता निम्नलिखित बसमार्गावर अतिरिक्त बसफे-यांचे प्रवर्तन कार्यान्वित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | बसमार्ग क्र. | गंतव्यस्थान | | बसआगार |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| १. | सी-१५ | वरळी आगार | मजास आगार | मजास |
| २. | सी-४० | प्र. ठाकरे उद्यान(शिवडी) बसस्थानक | मजास आगार | मजास |
| ३. | सी-६१ | मुलुंड आगार | ओवळेगांव | मुलुंड |
| ४. | ए-२२० | वांद्रे बसस्थानक (पश्चिम) | शेर्लीगांव | वांद्रे |
| ५. | ए-२४९ | अंधेरी स्थानक (पश्चिम) | सातबंगला बसस्थानक | ओशिवरा |
| ६. | ए-२७३ | मालाड स्थानक (पश्चिम) | मालवणी ब्लॉक क्र.५ | मालवणी |
| ७. | ए-३३४ | मरोळ आगार | जांभूळपाडा | मरोळ |
| ८. | ए-३६९ | चेंबूर वसाहत | वाशीनाका एमएमआरडीए वसाहत | आणिक |

**बसमार्गाचे विलिनीकरण**

| अ.क्र. | बसमार्ग क्र. | गंतव्यस्थान | | बसआगार | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | |
| १. | ए-२५१ | सातबंगला बसस्थानक | वेसावा-यारी रोड बसस्थानक | ओशिवरा | वातानुकूलित बसमार्ग क्र.ए-२४९ मध्ये विलिन |
| २. | सी-११ | इलेक्ट्रिक हाऊस | धारावी आगार | धारावी | बसमार्ग क्र.११ मर्या. मध्ये विलिन |

बेस्ट उपक्रमाच्या बसप्रवर्तनामधील उपरोक्त बदलाची नोंद सर्व प्रवाशांनी घ्यावी आणि बससेवेचा लाभ घ्यावा.

........

Scanned with OKEN Scanner

6604

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

## प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिद्धीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

Dmmasus 6/07/2022

(सुरेश गायकवाड )
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिद्धी पत्रक क्रमांक २०
दिनांक : ०६.०७.२०२२

**बेस्ट उपक्रमाच्या विजग्राहकाना येणाऱ्या वीज बिलाच्या फसव्या लघुसंदेशाबाबत**

मुंबई ६- असे आढळून आले आहे की आमच्या अनेक वीज ग्राहकांना त्यांच्या भ्रमणध्वनीवर फसवे लघुसंदेश (SMS) प्राप्त होत आहेत ज्यामध्ये विद्युत पुरवठा खंडित करण्याची धमकी दिली जात आहे आणि दिलेल्या भ्रमणध्वनी नंबर वर कॉल करण्यास मांगत आहेत. पुढे जेव्हा ग्राहक या फसव्या भ्रमणध्वनीवरकॉल करतात तेव्हा त्यांना विशिष्ट ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते आणि नाममात्र रकमेचा व्यवहार ऑनलाइन करण्यास सांगतआहेत. नंतर फसवणूक करणारा ग्राहकाचा पासवर्ड/ओटीपी चोरतो. त्यानंतर ग्राहकांनी त्यांच्या बँक खात्यातून फसवणूक करून पैसे काढल्याची तक्रार केली आहे.

या संदर्भात बेस्ट आपल्या ग्राहकांना कळवू इच्छिते की बेस्टउपक्रमाच्या वतीने बिलाबाबतचे लघुसंदेश (SMS) नेहमीच कोणत्याही भ्रमणध्वनीवरून न पाठविता "BESTSM" द्वारेच पाठविले जातात. जर आपणांस विजबिलाबाबत अथवा वीजपुरवठा खंडीत करण्याबाबतचा लघुसंदेश (SMS) "BESTSM" व्यतिरिक्त एखाद्या कोणत्याही भ्रमणध्वनीवरून आल्यास व संपर्कासाठी दिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्यास सांगितले असल्यास कृपया अशा प्रकारच्या लघुसंदेशांना प्रतिसाद देऊ नका. तुमचा पासवर्ड, ओटीपी पिन चोरण्यासाठी आणि तुमची फसवणूक करण्यासाठी तुम्हाला ऑनलाइन व्यवहार करण्यास मांगणारा हा फसवा लघुसंदेशअसू शकतो.

संबंधित प्रभागांसाठी बेस्ट उपक्रमाचे ग्राहक सेवा कॉलिंग क्रमांक बेस्ट उपक्रमाच्या www.bestundertaking.com वेबसाइट वर उपलब्ध आहेत. कोणत्याही मदतीसाठी/मार्गदर्शनासाठी त्यांच्याशी संपर्क साधला जाऊ शकतो.

ग्राहकांना विनंती आहे की अशा कोणत्याही लघुसंदेशाशी व्यवहार करताना सावधगिरी बाळगावी आणि तुमचा पासवर्ड/ओटीपी अशा फसव्या व्यक्तींना देऊ नका व फसवणुक होण्यापासून स्वतःला वाचवा असे आवाहन बेस्ट उपक्रमाच्या वतीने करण्यात येत आहे.

........

Scanned with OKEN Scanner

८७४

**PRESS NOTE**

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

**बेस्ट**
**प्रसिद्धी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्त संपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.२१
दिनांक : ०८.०७.२०२२

**छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि खारघर,**
**नवी मुंबई दरम्यान वातानुकूलित बससेवा कार्यान्वित.**

मुंबई ०८ - बेस्ट उपक्रमाने अलिकडील काळात प्रवाशांच्या सोयीकरीता वेगवेगळया बससेवा कार्यान्वित केलेल्या आहेत. यापैकी संपूर्ण दिवस / रात्र बससेवा तसेच छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून मुंबईच्या विविध भागात वातानुकूलित बससेवा सुरु करण्यात येणार आहे. या बससेवांपैकी काही बससेवा लगतच्या शहरांमधील काही प्रमुख ठिकाणांपर्यंत विस्तारीत करण्यात आलेल्या आहेत.

**सोमवार, दि.११ जुलै २०२२** पासून मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून वाशी बसस्थानक दरम्यान प्रवर्तित होणा-या वातानुकूलित बसमार्ग क्र.**'एअर पोर्ट सेवा-२'** या बसमार्गाचा याच बीच मार्गावरुन कोकणभवन, सीबीडी-बेलापूरमार्गे जलवायू विहार, खारघर पर्यंत विस्तार करण्यात येत आहे.

या बसमार्गाच्या प्रवर्तनाची ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे -

१. बसगाडया : वातानुकूलित - मिडी

२. प्रस्थानांतर : ९० मिनिटे(२४ x ७ बसप्रवर्तन)

३. **प्रस्थानस्थान** - : **पहिली बस (वेळ)**

**अ) छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ:** **६.२०**

**ब) जलवायू विहार, खारघर** : **४.२०**

४. प्रवर्तनकाळ : संपूर्ण आठवडा

५. बसभाडे :

| **पासून** | **पर्यंत** | **तिकीट मुल्य** |
|---|---|---|
| छत्रपतीशिवाजीमहाराजआंतरराष्ट्रीय विमानतळ ते | वाशी | रु.१५०/- |
| —''— | ते सिवुड | रु.१७५/- |
| —''— | ते सिबीडी | रु.२२५/- |
| —''— | ते जलवायू विहार-खारघर | रु.२५०/- |

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथून प्रवर्तित करण्यात येत असलेल्या या वातानुकूलित बससेवेचा लाभ प्रवाशांनी घ्यावा असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात येत आहे.

......

Scanned with OKEN Scanner

८८५
१०११
८३५

**PRESS NOTE**

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

**प्रसिद्धी पत्रक**

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिद्धीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

मनुवराडे ८/७/२०२२

(मनोज वराडे )
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिद्धी क्रमांक २२
दिनांक : ०८.०७.२०२२

'<u>बस मार्ग क्रमांक ए ११५ वर दोन अतिरिक्त बस फेऱ्या</u>'

मुंबई, ०८ - प्रवाशांच्या वाढत्या मागणीनुसार आजपासून बस मार्ग क्रमांक ए ११५ वर मंत्रालय जिमखाना/ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पर्यंत सायंकाळी ६.३५ आणि ६.५० या वेळेत दोन अतिरिक्त बस फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. तरी प्रवाशांनी सदर अतिरिक्त बस फेऱ्यांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात येत आहे.

........

८८४
१०११
८४४

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट

# प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१

कृपया प्रसिध्दी करिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

प्रमुवराडे ८/७/२०२२.
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.२३
दिनांक : ०८.०७.२०२२

## नवीन बसमार्ग क्र.ए –११४

मुंबई, ०८ - बेस्ट उपक्रमातर्फे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मेट्रो सिनेमा / बॉम्बे हॉसिपटल आणि आयकर भवन या मार्गावर प्रवास करणा-या प्रवाशांच्या सोयीसाठी दिनांक ११ जुलै २०२२ पासून बसमार्ग क्र.ए-११४ सुरु करण्यात येणार आहे.

सदर बसमार्ग छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून वर्तुळाकार मार्गाने महापालिका मार्ग जिमखाना, मेट्रो सिनेमा, आयकर भवन, चर्चगेट स्टेशन, हुतात्मा चौकमार्गे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस असा चालविण्यात येणार आहे.

सदर बस गर्दीच्या वेळेस म्हणजेच सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० वदुपारी १४.३० ते रात्री २०.३० या वेळेत चालविण्यात येईल.

Press Note No.23

Date : 08.07.2022

## New Bus Route No.A-114

Mumbai , 08 - The BEST Undertaking will be introducing New Bus Route No.A-114 from 11th July, 2022 for the convenience of passengers travelling from Chhatrapati Shivaji Maharaj Terminus to Metro Cinema / Bombay Hospital and Ayakar Bhavan, Churchgate.

This bus will be operated from Chhatrapati Shivaji Maharaj Terminus in a ring pattern via Mahapalika Marg, Gymkhana, Metro Cinema, Ayakar Bhavan, Churchgage Station, Hutatma Chowk and then to Chhatrapati Shivaji Maharaj Terminus.

The bus will be operated during morning and evening peak period from 08.30 to 12.30 hours and 16.30 to 20.30 hours respectively.

...

Scanned with OKEN Scanner

2011
2001

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्त संपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.२४
दिनांक : १४.०७.२०२२

## छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते खारघर दरम्यानच्या वातानुकुलित सेवेबाबत

मुंबई १४ - अलिकडेच दिनांक ११ जुलै २०२२ पासून बेस्ट उपक्रमाने प्रवाशांच्या सेवेकरिता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून पाम बीच मार्ग, एन.आय.आर.कॉम्प्लेक्स, सी वुड, नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर मार्गे जलवायू विहार ते खारघरपर्यंत संपूर्ण दिवस / रात्र बससेवा वातानुकुलित बसमार्ग क्र. **एअरपोर्ट सेवा – २** कार्यान्वित केली आहे.

प्रवाशांच्या वाढत्या मागणीनुसार दिनांक १५ जुलै, २०२२ पासून सदर बससेवेचे प्रस्थानांतर ९० मिनिटांवरुन ५० मिनिटे इतके कमी करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे सदर बसमार्गावर प्रवास करण्याकरिता प्रवासी बेस्ट चलो मोबाईल ॲप, बेस्ट चलो बसकार्ड आणि एन.सी.एम.सी. या कार्डाचा उपयोग करुन आपले तिकिट खरेदी करु शकतात.

तरी सर्व प्रवाशांनी याची नोंद घेऊन या बससेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२५
दिनांक : २२.०७.२०२२

## बस मार्ग क्र. ए ११५ ची शेवटची बस

मुंबई, **२२** - बेस्ट उपक्रमाने प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेऊन आज पासून बस मार्ग क्र. ए ११५ ची शेवटची बस मंत्रालय जिमखाना / यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पर्यंत रात्री ९.३० वाजता सोडण्यात येणार आहे.

तरी, सर्व मुंबईकर जनतेने या बदलाची नोंद घेऊन या सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन बेस्ट उपक्रमाद्वारे करण्यात येत आहे.

.......

Scanned with OKEN Scanner